# <u>सूचना (NOTIFICATION)</u>

## <u>महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सरळसेवा भरती - २०२१</u>

म्हाडा सरळसेवा भरती २०२१ करीता दि.३१.०१.२०२२, दि.०१.०२.२०२२, दि.०२.०२.२०२२, दि.०३.०२.२०२२, दि.०७.०२.२०२२, दि.०८.०२.२०२२, व दि.०९.०२.२०२२ अशा एकूण ७ दिवशी परीक्षा होणार असून परीक्षेचे वेळापत्रक यापूर्वीच प्रसिध्द करण्यात आले आहे. ऑनलाईन पध्दतीने होणा-या म्हाडा सरळसेवा परीक्षेकरीता उमेदवारांकरीता महत्वाच्या सूचना देण्यात येत आहेत.

**<u>परीक्षेला येताना घ्यावयाची काळजी -</u>**

१. परीक्षेला येताना तीन पृष्ठाचे प्रवेशपत्र घेऊन यावे. प्रवेशपत्रातील पृष्ठ क्रमांक १ वर प्रवेशपत्रावर अंकीत झालेल्या फ़ोटोच्या शेजारी उमेदवारानी त्याचा पासपोर्ट आकाराचा फ़ोटो चिकटवायचा आहे. त्या फ़ोटोवर उमेदवारांने परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षकाच्या समक्ष सही करावयाची आहे.

२. प्रवेशपत्रातील पृष्ठपत्र दोनवरील स्वंय घोषणापत्र उमेदवारांनी येताना भरावयाचे आहे. तथापि, त्यावर स्वाक्षरी परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षकाच्या समोर करावयाची आहे.

३. उमेदवारांनी परीक्षेस येताना पॅनकार्ड / वाहनचालक परवाना/ मतदार ओळखपत्र /आधार कार्ड किंवा शासनाने वितरीत केलेले ओळखपत्र मूळ स्वरूपातील घेऊन यायचे आहे. ओळखपत्रावरील फ़ोटो स्पष्ट दिसणारा असावा. (ओळखपत्राची छायांकीत प्रत, मोबाईल फ़ोनमधील स्कॅन केलेले ओळखपत्राचे फ़ोटो इ. वैध पुरावे म्हणून विचारात घेतले जाणार नाहीत.)

४. परीक्षा केंद्रावर उमेदवारांना कोणत्याही व्यक्तिगत वस्तु सोबत बाळगण्यास परवानगी दिली जाणार नाही. जसे की, मोबाईल फ़ोन्स, स्मार्ट वॉच, आणि इतर इलेक्ट्रॉनिक तसेच बंदी घातलेले/प्रतिबंधीत वस्तूचा समावेश असेल. परीक्षेचे अधिकारी /म्हाडा व्यक्तिगत वस्तुंच्या सुरक्षिततेसाठी जबाबदार नसतील.

५. परीक्षा केंद्रावर उमेदवारांच्या परीक्षा पत्रावरील बारकोड स्कॅन केले जाईल. तसेच सर्व उमेदवारांचे फ़ोटो काढले जातील. याकरीता उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर किमान दीड तास अगोदर पोहचावे. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावरील कर्मचा-याना या सर्व कार्यपध्दतीकरीता सहकार्य करावयाचे आहे. अन्यथा उमेदवारांना परीक्षा केंद्रावर प्रवेश नाकारला जाऊ शकतो.

६. या परीक्षेकरीता नकारात्मक गुण देण्याची पध्दती (Negative marking system) नसणार आहे.

७. **<u>उमेदवारांनी अर्ज भरताना अपलोड केलेला फ़ोटो आवश्यक त्या Format, Size मध्ये नसल्याने किंवा Resoluition / Pixel जुळत नसल्याने काही उमेदवारांच्या प्रवेशपत्रामध्ये फ़ोटो छायाचित्र</u>**

**दिसत नाही. अशा उमेदवारांनी परीक्षेस येताना त्यांचा १ फ़ोटो राजपत्रित अधिकारी (Gazetted Officer) किंवा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक (Head Masters/Principal of Secondary or Higher Secondary Schools/Colleges) किंवा एम.बी.बी.एस. /एम.डी./एम.एस. पदवीप्राप्त डॉक्टर (M.B.B.S./M.D./M.S. Degree Holder Doctor / Medical Officer) यांचेकडून प्रमाणित करून सोबत आणावयाचा आहे.**

८. उमेदवारांना ऑनलाईन परीक्षा पध्दती व त्याचे स्वरूप समजावी याकरीता मॉकलिंक देण्यात येत आहे. उमेदवारांना यामुळे परीक्षेचे स्वरूप समजण्यास मदत होईल.
https://g06.tcsion.com:443//OnlineAssessment/index.html?31659@@M211

९. दिव्यांग उमेदवारांनी त्याना मदतनीस व अतिरीक्त वेळ हवी असल्यास परिशिष्ट १ व परिशिष्ट-२ मध्ये नमूद विहीत नमुन्यातील मूळ फ़ॉर्म आवश्यक सर्व कार्यवाही करून परीक्षेस येताना सोबत आणावयाचे आहे.

**१०. म्हाडा सरळसेवा भरती-२०२१ करीता ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येत आहे. ऑनलाईन परीक्षेकरीता यापूर्वी नमूद करण्यात आलेल्या परीक्षा केंद्रावरच सर्व उमेदवारांची परीक्षा घेणे साधनसामग्री अभावी शक्य नाही. यास्तव त्याचे लगतचे जिल्हे/शहरे यामधील केंद्रे सुनिश्चित करण्यात आलेली आहेत. त्यामुळे उमेदवारांना त्यांनी नमूद केलेल्या केंद्राव्यतिरिक्त अन्य केंद्रे देण्यात आलेली आहेत. केंद्र आवंटन करताना प्रथमत: दिव्यांग उमेदवारांना त्यांनी मागणी केलेले केंद्र देणे, त्यानंतर महिला उमेदवारांना त्यांनी मागणी केलेले केंद्र देणे त्यानंतर अन्य उमेदवारांना सामावून घेणे. त्यानंतर उर्वरीत उमेदवारांना संलग्न जिल्ह्यामध्ये किंवा शक्य असल्यास त्यांच्या कायमचे निवास असलेल्या जिल्ह्याच्या ठिकाणी केंद्र देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. सरळसेवा भरती सुरळीत होण्याकरीता उमेदवारांनी म्हाडास सहकार्य करावे. केंद्र बदलून मिळण्याकरीता अर्ज किंवा फ़ोन/इ-मेल करू नयेत.**

११. परीक्षा प्रवेश पत्रातील सर्व सूचना उमेदवारांनी बाराकाईने वाचायच्या आहेत व सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करावयाचे आहे.

परीक्षेबाबत सविस्तर सूचना व माहिती म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावरून वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारानी म्हाडा संकेतस्थळास वारंवार भेट द्यावयाची आहे.

**सचिव**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**